“ई.व्ही.रामास्वामी नायकर यांचे कार्य आणि कर्तृत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र या विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा पीएच.डी.संशोधन आराखडा.

संशोधक

दिपक मधुकर भालेराव

एम.ए., नेट (राज्यशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.जे.टी.कांबळे

एम.ए.,पीएच.डी., नेट

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

संजीवनी महाविद्यालय, चापोली

डिसेंबर : २०१९

प्रस्तावना

मध्ययुगीन कालखंडामध्ये मनुस्मृतिने यज्ञ, पूजा, अर्चा, दान-धर्म, जन्म, मृत्यू, पूनर्जन्म, पाप-पुण्याचे मार्ग, मोक्षप्राप्ती इत्यादी कर्मकांडावर महत्त्व देतानाच चातुर्वण्र् व्यवस्था निर्माण करुन मानवामध्ये श्रेष्ठ -कनिष्ठ असा भेदभाव केला. तर दुसरीकडे समाजात अनिष्ठ प्रथा, परंपरा, अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड, स्पृश्य-अस्पृश्य भावना इत्यादी समस्यांमुळे समाजात अराजकता माजली होती. त्यामुळे निसर्गतः स्त्री आणि परूष यांच्यातील लिंग भेदाचा फरक सोडला तर पृथ्वीतलावर सर्व मानव एक समान होते. परंतु मनुस्मृति या ग्रंथाने मानवाला प्राण्यापेक्षा ही हीन दर्जाची वागणूक दिलेली दिसून येते. एखाद्या तलावातील किंवा पाणवट्यावरील पाणी जनावराला मुक्तपणे पिण्याचे स्वतंत्र होते. परंतु समाजव्यवस्थेतील काही घटकांना पाणी पिण्याचे पूर्णपणे बंधन घातले होते. या परिस्थितीचा संत किंवा समाजसुधारक यांच्यावर फार मोठा परिणाम झाला होता. यामुळे समाजजीवनाचा आपण एक अंग आहोत म्हणून त्यांनी जगातील मानवांच्या कल्याणासाठी आपले आयुष्य सर्मपित केले. या संदर्भात संत नामदेव म्हणतात की, "ब्रह्मामूर्ती संत जगी अवतरले। उध्दरावया आले दीन जना"।। यावरुन असे दिसून येते की, संताचे सामाजिक विचार किंवा कार्य हे सर्व शोषित, पीडित, श्रेष्ठ-कनिष्ठ, लहान-थोर, स्त्री पुरुष अशा सर्वासाठीच होते. सामाजिक सुधारणावादी विचारांचा प्रचार व प्रसार समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत झाला पाहिजे याच हेतूने त्यांनी भजन-कीर्तन, भारुड व अभंगाच्या माध्यमातून सर्वसामान्यांशी ऱ्हदयसंवाद साधला. सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी संत मंडळीबरोबर समाजसुधारक आणि महामानवाचे मोठे योगदान लाभले आहे. यामध्ये महात्मा बसवेश्वर, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर, संत तुळसीदास, संत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज तसेच महारत्मा गोतम बुद्ध, महाविर, गुरूनाकदेव, राजा रॉम मोहनरॉय, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, ईश्वरविद्या सागर, धोंडो केशव कर्वे, पांडुरंग शास्त्री आठवले आदींचा उल्लेख करता येईल. संत, समाजसुधारक किंवा महामानवाचा वसा पुढे चालविण्यासाठी दक्षिण भारतातील अग्रणी महान पंडीत, तामिळ प्रखर राष्ट्रवादी,

राजनेता, सामाजसुधारक असे अष्टपैलू नेतृत्व म्हणजे ई.व्ही.रामास्वामी नायकर यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

ई.व्ही.रामास्वामी यांचे प्रशंसक त्यांच्यावर प्रेम करणारा जनसमुदाय त्यांना आदराने ‘पेरियार’ या नावाने ओळखत होते. तसेच ई.व्ही.रामास्वामी नायकर यांना ई.व्ही.आर. ‘थांताई पेरियार’ या नावानेही ओळखले जाते. युनेस्कोने त्यांना नवीन युगाचे ‘पैंगबर’ अशी उपाधी दिली आहे. तर दक्षिण पूर्व आशिया खंडाचे ‘सॉक्रेटिस’ सामाजिक सुधारणा आंदोलनाचे ‘पितामह’ अशा कितीतरी उपाद्या त्यांच्या कार्याला मिळाल्या आहेत. त्यामुळे ते थोर भारतीय सामाजसुधारकापैकीच पेरियार ई.व्ही.रामास्वामी नायकर एक होते. अशा या महान समाजसुधारकाचा जन्म तामिळनाडूतील ‘ईरोडा’ या गावात यांचा जन्म एका कट्टर धार्मिक घरात १७ सप्टेंबर १८७९ मध्ये झाला. कारण रामास्वामी यांचे आईवडिल अतिशय धार्मिक होते. ते नित्यनियमाने विधी, पूजा करण्याबरोबर देव, देवतावर आस्था बाळगणारे होते. वडिलांची परंपरा कायम ठेवणे हे मात्र त्यांना अजिबात आवडले नाही. त्यामुळे त्यांनी विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय तत्वाच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्वीकारता आपल्या स्वतःच्या तत्त्वांची अंमलबजावणी कशापद्धतीने करता येईल यासंबंधी ई.व्ही.पेरियार रामास्वामी यांनी महत्त्वपूर्ण पाऊन उचलले आहे.

रामास्वामी हे मुळातच नास्तिक असल्यामुळे त्यांनी ईश्वरी आवतारांना विरोध केला. त्यांनी मानवामध्येच सर्व काही आहे असे सांगताना आपल्या विरोधाभासविरोधी निवेदन करताना असे म्हटले आहे की, ज्याने ईश्वर निर्माण केला तो मुर्ख होता, जो त्याचे नाव पसरवितो तो एक क्रोधी आहे, आणि जो त्याची उपासना करतो तो अशक्त आहे. या प्रकारचे त्यांचे विधान किंवा त्यांचा अशा प्रकारचा निरिश्वरवादावराचा हल्ला नक्कीच धार्मिक व्यक्तिंना मान्य होणार नाही. १९५६ मध्ये त्यांनी उत्तर भारतातील ‘कोंगूनाडू’ प्रदेशातील धर्मपूरी जिल्ह्या जवळील रामाच्या फोटोचे जाहीरपणे दहन केले. भारतीय धार्मिक भावनांना वेदना होत होत्या पण याचा त्यांनी अजिबातच विचार केलेला नाही.

रामास्वामी यांनी आपल्या वडीलांसमवेत अनेक धार्मिक स्थळांना भेटी दिल्या होत्या. या तीर्थक्षेत्रामध्ये प्रत्यक्षात कशा पद्धतीने काम चालते, तेथील पंडित, पुजारी व ब्राह्मण लोक भोळ्याभाबड्या भक्त गणांना कशा पद्धतीने लुटतात व तेथील भूमीचा कशापद्धतीने दुरूपयोग करतात हे समजले. त्याचेच एक उदाहरण म्हणजे सन १९०४ मध्ये जेव्हा काशीची यात्रा केली तेव्हा त्यांच्या जीवनामध्ये वेगळेच परिवर्तन घडून आले. कारण त्या काळात ब्राह्मणांचे वर्चस्व अधिक होते. त्यांनी भोजन करण्यासाठी निःशुलक भोजन कक्षामध्ये गेल्यानंतर त्यांना असे निदर्शनास आले की, सर्व ब्राह्मणासाठीच आहे. तरीही त्यांनी भोजन मिळविण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना तिथे अपमान सहन करावा लागला. एवढेच नव्हे तर तिथे त्यांना धक्के मारून बाहेर काढण्यात आले. त्यामुळे ते अधिक परंपरावादी हिंदुत्वाचे कट्टर विरोधक बनले. त्यानंतर मात्र कोणत्याही धर्माचा स्वीकार न करता संपूर्ण जीवन नास्तिक राहण्यातच योग्य मानले.

राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीतसुद्धा रामास्वामी यांनी अधिक प्रमाणात लक्ष केंद्रीत केलेले होते. ते प्रखर राष्ट्रवादी नेते होते. त्यांनी चक्रवर्ती राजगोपालचारी यांच्या सांगण्यावरून १९१९ मध्ये कॉंग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले तसेच त्यांनी महात्मा गांधी यांच्या असहकार आंदोलनात सक्रिय सहभाग घेतल्याने त्याना अटकही झाली. पुढे त्यांनी १९२५ मध्ये कॉंग्रेसला सोडचिट्टी दिली. आणि सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले. केरळ राज्यामध्ये 'वायकोम' येथे अस्पृश्यतेचे अत्यंत कडक नियम होते त्यामुळे कोणत्याही दलित व्यक्तिंना मंदिरापासून जाण्यास सक्त मनाई होती. ती दूर करण्यासाठी 'वायकोमचा सत्याग्रह' केला. या सत्याग्रहाला त्यांच्या मित्रांनी व पत्नीनेही मोलाचे सहकार्य केले. सामाजिक मतभेद दूर करण्यासाठी तसेच ब्रिटिश सरकारवर प्रभाव टाकण्यासाठी दबाव तंत्राचा वापर व प्रचार केला होता. यातुन त्यांचे 'आत्म अभिमान आंदोलन' यशस्वी झालेले पहावयास मिळते.

हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा म्हणून १४ सप्टेंबर १९४९ रोजी मान्यता मिळाली; पण तत्पूर्वी मद्रास प्रसीडेंसीच्या कॉंग्रेसने शाळेत १९३७ मध्ये हिंदी हा विषय अनिवार्य बनवून तामिळनाडूमधील हिंदी अधिकार सुरु केला; पण यासाठी तमिळांचा विरोध होता. तमिळांनी हिंदी भाषेच्या प्रक्षेपणाचा विरोध करण्याकरिता सर ए.डी. पनेरसेल्वम आणि पेरियार यांच्या

नेतृत्वाखाली १९३८ मध्ये न्यायमुर्तीनी हिंदी विरोधी आंदोलन आयोजित केले आणि राजाजी सरकारने त्यांना या आंदोलनामुळे तुरुंगात टाकले. याच काळामध्ये तामिळनाडूमधील अनेक महिला या आपल्या मुलांसह १२०० पेक्षा अधिक लोक तुरुंगात गेले होते. यामध्ये थलममुथू आणि नटराजन यांचा मृत्यू झाल्याने समाजामध्ये शासनाच्या विरोधात आक्रोश वाढल्याने. १९३९ मध्ये राजाजी सरकारने त्यांना सोडून दिले.

१९१६ मध्ये 'साऊथ इंडियन लिबरेशन एसोसिएशन' ची स्थापना झाली त्याचा मुळ हेतू हा ब्राह्मण समुदायाकडील आर्थिक व राजकीय शक्तीचा विरोध करून जे गैर ब्राह्मण आहेत त्यांना सामाजिक विकास करणे होता. काही काळानंतर हिच संस्था 'जस्टीस पार्टी' या नावाने पुढे आली. नंतर सन १९४४ मध्ये परियार यांनी जस्टिस पार्टी चे हे नाव बदलून 'द्रविड कळघम्' असे नामकरण केले. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनामध्ये अस्पृश्यता निवारण, महिला चळवळ, स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह अशा महत्त्वाच्या मुद्यावर लक्ष केंद्रीत केलेले आहे.

समस्यासूत्रण

२१ व्या शतकामध्ये भारताने औद्योगिक विकास, पायाभुत सुविधाची उभारणी, दळणवळण, संरक्षण व्यवस्था आणि अंतराळ मोहीम अशा सर्वच आघाडीवर नेत्रदिपक कामगिरी केली आहे. भारताने सर्वात यशस्वी आणि सर्वात मोठी लोकशाही म्हणून जगात नावलौकीक मिळवले आहे. या भारताच्या उभारणीमध्ये अनेक संत, समाजसुधारक आणि महापुरुषांचे योगदान लाभले आहे. तसेच दक्षिण भारतीय ई.व्ही.रामास्वामी नायकर यांचे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान असून सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी आणि दक्षिण भारतामध्ये द्रविड कळघम् या राजकीय पक्षाची स्थापना करून यशस्वी वाटचाल केली आहे. त्यामुळे त्यांची कामगिरी वाखाण्याजोगी असल्याने **ई.व्ही.रामास्वामी नायकर यांचे कार्य आणि कर्तृत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास** हा विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत अभ्यास पूर्ण करण्यासाठी खालील संशोधनाचे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. ई.व्ही.रामास्वामी नायकरपूर्व सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेणे.
२. ई.व्ही.रामास्वामी नायकर यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमिचा आढावा घेणे.
३. ई.व्ही.रामास्वामींचा भारताच्या स्वतंत्र लढ्यातील भूमिकेचा अभ्यास करणे.
४. ई.व्ही.रामास्वामी नायकर यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्यातील योगदानाचा आढावा घेणे.
५. ई.व्ही.रामास्वामी नायकर यांच्या कार्याची समकालीन परिस्थितीमध्ये पडताळणी करणे.

संशोधनाची गृहीतके

वैज्ञानिक पध्दतीने एखाद्या विषयाचा अभ्यास करत असताना प्रारंभिक ज्ञानाच्या आधारे संशोधक सामान्यअनुमान मांडतो हे अनुमान पुढील संशोधनासाठी मार्गदर्शक ठरत असते. अशा पूर्वानुमानास गृहीतकृत्य वा उपकल्पना म्हणतात.

वेबस्टर शब्दकोष १९५६ नुसार गृहितकृत्ये म्हणजे एखादे गृहित धरलेले विधान तत्व किंवा एखादी अट होय. गृहीतकृत्याच्या उपयुक्तेबाबत समाजशास्त्रीय संशोधक व अभ्यासक एल. कोटेन व नॅगेल म्हणतात. चौकशी वा संशोधनास चालना देणाऱ्या प्रारंभिक अडचणीचे वा समस्याचे संभाव्य निराकरण वा उत्तर सुचविल्या खेरिज आपण संशोधन कार्यात पहिले पाऊल देखील उचलू शकत नाही. समस्येची अशी संभाव्य उत्तरे आपणास अध्ययन विषयाबाबतच्या पूर्वज्ञानामुळे सूचतात अशा उत्तराचे जेव्हा विधानामध्ये रुपांतर केले जाते तेव्हा ती उत्तरे गृहीतकृत्ये बनतात.

१. ई.व्ही.रामास्वामी नायकर यांची कौटुंबिक पार्श्वभूमी ही सदन आणि सुखसंपन्न अशीच होती.

२. ई.व्ही.रामास्वामी यांचे भारताच्या स्वतंत्र लढ्यात महत्त्वाचे योगदान राहिले आहे.

३. ई.व्ही.रामास्वामी नायकर यांनी सद्सद्विवेक बुद्धीवर आधारित वैज्ञानिक दृष्टिकोनातून समाजाच्या मांडणीला प्राधान्य दिले आहे.

४. ई.व्ही.रामास्वामी नायकर यांचे विचार समकालीन परिस्थितीमध्ये दिशा दर्शक ठरणारे आहेत.

संशोधन पद्धती

प्रस्तुत अभ्यास हा प्रामुख्याने ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरुपाचा असून तथ्यसंकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. तसेच रामास्वामी यांच्या नेतृत्वाला आकार देणाऱ्या महत्त्वाच्या घटना घडामोडी, प्रसंग, त्यांना प्रभावित करणारे विचार, व्यक्ती तत्कालीन परिस्थिती या संबंधाने प्रथम व दुय्यम साधना द्वारे तथ्य संकलन केले आहे. त्यात रामास्वामी यांनी लिहिलेले ग्रंथ, नियतकालिके व वृत्तपत्र यामध्ये प्रकाशित झालेले लेख आदी माहिती संकलित करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा

संशोधन कार्याला निश्चित स्वरूपाची दिशा असणे महत्त्वाचे आहे. कारण संशोधनाला विशिष्ट आकार नसेल तर संशोधन कार्य दिशाहीन होत असते. रामास्वामी यांच्या कालखंडात अनेक राजकीय व सामाजिक चळवळी उदयास आल्या आहेत; पण या सर्व चळवळींची व संबंधीत कालखंडातील सर्व तत्वज्ञांच्या विचाराचा प्रस्तुत संशोधन कार्यात उहापोह करणे शक्य होणार नाही. रामास्वामी यांची जडणघडण राजकीय व सामाजिक विचार प्रवाह, वैचारिक दृष्टिकोन आदींचा अभ्यास या संशोधनात करण्यात येणार आहे.

संशोधनाचे महत्व

भारताची समकालीन स्थितीमध्ये सर्वच आघाडीवर यशस्वी कामगिरी चालू असली तरी यामध्ये अनेक असे घटक आहेत की, गेल्या ७२ वर्षामध्ये त्यात सुधारणा झालेल्या दिसून येत नाहीत. यामध्ये प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड, पूजा-पाठ, देवदासी, वाघ्या मुरोळी तसेच राजकारणाचे गुन्हेगारीकरण, वाढता भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी असे अनेक प्रश्न समोर आले आहेत. त्यामुळे आजच्या सद्यःस्थितीमध्ये स्वतंत्रपूर्व कालखंडातील समाजसुधारक आणि राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे **ई.व्ही.रामास्वामी नायकर यांचे कार्य आणि कर्तृत्वाचा विश्लेषणात्मक अभ्यास** करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाचा आराखडा

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत पहिल्या प्रकरणामध्ये संशोधनाची रूपरेषा मांडली असून यामध्ये समस्यासुत्रण, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाचे गृहीतके, संशोधन पद्धती, संशोधनाची मर्यादा, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाचा आराखडा इत्यादीचा आढवा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : ई.व्ही.रामास्वामीपूर्व दक्षिण भारतातील सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणामध्ये रामास्वामीपूर्व भारतातील सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : ई.व्ही.रामास्वामी यांच्या नेतृत्वाची जडणघडण

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणामध्ये रामास्वामी यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, जन्म व बालपण, शिक्षण, वैवाहिक जीवन यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : ई.व्ही.रामास्वामी नायकर यांचे सामाजिक व राजकीय कार्य कर्तृत्व

पेरियार रामास्वामी व ब्राह्मण आणि ब्राह्मणेत्तर चळवळी, मंदिर प्रथेला विरोध, आत्म सन्मान चळवळ, हिंदी भाषा व द्रविड समाज, अस्पृश्यता विरोधी चळवळी, सामाजिक प्रथा परंपरा विरोधी आंदोलन, काँग्रेस प्रवेश व त्याग, असहकार आंदोलनातील सहभाग, आत्मसन्मान चळवळ, हिंदी भाषा व पेरियार रामास्वामी, जर्स्टिस पार्टी व रामास्वामी, द्रविड कळघम सोबतचे कार्य, धर्म व राष्ट्रवाद, रामास्वामी स्त्री हक्क चळवळ, मार्क्सवादा संबंधीचे विचार यांचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण पाचवे : ई.व्ही.रामास्वामी नायकर यांच्या विचारांची समकालीन परिस्थितीमध्ये प्रस्तुतता

पेरियार यांच्या कार्याचे यशापयश, तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थिती आणि तामिळनाडूच्या सद्यपरिस्थितीची तुलना याचा आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष

१. प्रा.डॉ.विमलकिर्ती, क्रांतिवारी बुद्धिजीवी समाजसुधारक पेरियार ई.व्ही.रामास्वामी

२. अजय कुमार, पेरियार रामास्वामी : जीवन और दर्शन

३. सं.एस.एस.गौतम, पेरियार ने कहा

४. पेरियार ई.व्ही रामास्वामी नायर : व्यक्तित्व, विचार एवं सामाजिक क्रांति

५. पेरियार ई.व्ही रामास्वामी नायर, बहुजन कल्याण प्रकाशन

६. सम्यक प्रकाशन, पेरियार : सचित्र जीवनी

७. पेरियार ई.व्ही रामास्वामी नायर : सच्ची रामायण

८. रा.ना.घाटोले, सामाजिक संशोधन पध्दती

९. पु.ल.भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती

१०. गुरुनाथ नाडगोडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१

११. Gopalakrishnan, M.D., Periyar Father of The Tamil Race, Madras, 1991

१२. Subramaniyam, M.K., Periyar Self-Respect Philosophy, Erode, 1980

१३. Veeramani, K., Collected Works of Periyar, Chennai, 2005

१४. Viswanathan, E. Sa., The Political Career of E.V. Ramaswamy Naicker, A Study of the Politics of Tamil Nadu, 1920-1949, Ravi & Vasant Publisers, Madras

१५. Murugesan, K., and Subramanian, C.S., Singaravelu, The

१६. Communist of India, People's Publishing House, New Delhi,

१७. Saraswathi, S., Towards Self Respect, Chennai, 2004

१८. Robert L. Hardgrave, The Dravidian Movement (Bombay: Popular Prakashan, 1965)

१९. Anita Deihl, Periyar E.V. Ramasami, Madras, 1978

२०. Velusamy, Periyar - The Social Scientist, Salem, 1999

२१. Ghurye, G.S., Caste and Race in India, Bombay, 1986

२२. Karan Singh., Religions of India, New Delhi, 1983

२३. HanumanthK.R., Untouchability, Madurai, 1979

२४. Braj Ranjan Mani, Debrahmanising History, New Delhi, 2005

२५. Manusmriti, Asian Educational Services, New Delhi, 1982

२६. Pillai, K.K., The Caste System in Tamil Nadu, Chennai, 2007

२७. Subrahmanian, N., Tamil Social History, Vol. I, Chennai, 1997

२८. Anaimuthu, V., Thoughts of Periyar E.V.R., Vol. I (Tl.), Trichy, 1974

२९. Ketkar, The Concept of Equality and the Caste System,

३०. www.google.com. June 25, 2005

३१. Gopinatha Rao, The History of Sri Vaishnavas, Madras, 1923

३२. Shankar Rao, C.N., Sociology of Indian Society, New Delhi, 2004

३३. Periyar : A political Biography of E.V. Ramaswamy – Kindle

३४. Edition – Bala Jeyaraman-10sept2012

३५. Veeramani, Periyar on Women’s Rights, Chennai, 1999

३६. Prakash Arumugam, “Social Reformer: E. V. R. Periyar

३७. Religion and Society. Madras: Emerald Publishers, 1994.

३८. Periyar E.V.Ramaswamy,M.H.Syed.

३९. Periyar Feminism, Dr.Veeramani.

४०. Periyar a Comparative Study, Prof.R.Perumal.

४१. Words of Freedom Ideas of Nation, Periyar E.V.Ramasami.

४२. Why were women enslaved, Thanthai Periyar.

संशोधक **मार्गदर्शक**

दिपक मधुकर भालेराव **प्रा.डॉ.जे.टी.कांबळे**

एम.ए.,पीएच.डी., नेट
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
संजीवनी महाविद्यालय, चापोली